म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काव्य
दा. क्र. ८१९९

IRBK-0108199




तिरंगी झेंडा कोणाचा ? स्वतंत्र हिन्दी राष्ट्राचा !




वर्ष १ लें ] लेखक व संपादक : ग. का. रायकर [ मूल्य ४ आणे

आमच्या राष्ट्रीय झेंड्याला
जन्म देऊन त्याचें वैभव
वाढविणाऱ्या जगद्वंद्य
महात्मा गांधींस
—समर्पण—



## — सुस्वागतम् —

तिरंगी झेंडा आमचा प्राण आहे! आपला भारत देश आतां स्वतंत्र झाला असल्यामुळें त्याची प्रतिष्ठा वाढली आहे. चला! आपण झेंडावंदन करूं व या तिरंगी राष्ट्रीय झेंड्याचा हा स्फूर्तिदायक इतिहास वाचून हीं ध्वजगीतें गाऊं!

**हांसत नाचत जाऊं। जाऊं झेंडावंदनाला ॥**


| मुद्रक | प्रकाशक | मुखपृष्ठ |
|---|---|---|
| र. रा. बखले | ग. का. रायकर | चित्रकार |
| मुंबई वैभव | झावबाची वाडी | रघुवीर |
| प्रेस: मुंबई नं. ४ | मुंबई २ | मुळगांवकर |



# राष्ट्रगीत

वन्दे मातरम् ।

सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम् ।
सस्य श्यामलाम् मातरम् ॥ ध्रु० ॥

शुभ्रज्योत्स्ना–पुलकित–यामिनीम्
फुल्लकुसुमित–द्रुमदल—शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुर—भाषिणीम्
सुखदाम्, वरदाम् मातरम् ॥ १ ॥

त्रिंशत्कोटिकंठ–कलकल–निनादकराले
द्विर्त्रिंशत्कोटि–भुजैर्धृत–खर – करवाले
के बले मा तुमि अ ब ले
बहु–बल–धारिणीम्, नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीम्, मातरम् ॥ २ ॥

तुमि विद्या तुमि धर्म । तुमि हृदि तुमि मर्म ।
त्वं हि प्राणाः शरीर ।
बाहु ते तुमि मा शक्ति । हृदये तुमि मा भक्ति ।
तोमारइ प्रतिमा गडि मन्दिरे मन्दिरे मातरम् ॥ ३ ॥

त्वं हि दुर्गा दशप्रहरण–धारिणी
कमला कमल—दल—विहारिणी
वा णी वि द्या दा यि नी
नमामि त्वाम् मातरम् ॥ ४ ॥

नमामि कमलाम्, अमलाम् अतुलाम्
सुजलाम् सुफलाम् मातरम्
श्यामलाम्, सरलाम्, सुस्मिताम्, भूषिताम्
धरणीम्, भरणीम्, मातरम् ॥ ५ ॥

★

—बाबू बंकिमचंद्र



# झण्डा ऊँचा रहे हमारा!

सर्व विश्वाला जिंकणारा असा हा आमचा आवडता तिरंगी झेंडा उंच फडकत राहो ! आमच्या राष्ट्रवीरांनीं आमच्याच उद्धारार्थ केलेल्या बलिदानानें बनलेला हा आमचा झेंडा आम्हाला स्फूर्ति आणि शक्ति दिल्याखेरीज कसा राहील ? त्याची प्रतिष्ठा व डौल राखण्यासाठीं आम्ही आनदानें प्राण देऊं !

**विजयी विश्व तिरंगा प्यारा । झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ ध्रु० ॥**

सदा शक्ति सरसानेवाला
प्रेमसुधा बरसानेवाला
वीरों को हरषानेवाला
मातृ-भूमिका तनमन सारा। झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ १ ॥

स्वतंत्रता के भीषण रण में
लखकर जोश बढे क्षण-क्षण में
काँपे शत्रु देख कर मन में
मिट जाये भय संकट सारा । झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ २ ॥

इस झण्डे के नीचे निर्भय
लें स्वराज्य हम अविचल निश्चय
बोलो भारत माता की जय
स्वतंत्रता हो ध्येय हमारा । झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ ३ ॥

आओ प्यारे वीरो ! आओ
देश धर्म पर बलि बलि जाओ
एक साथ सब मिलकर गाओ
प्यारा भारत देश हमारा । झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ ४ ॥

इसकी शान न जाने पाये
चाहे जान भले ही जाये
विश्व-विजय करके दिखलाये
तब होवे प्रण पूर्ण हमारा । झण्डा ऊँचा रहे हमारा ॥ ५ ॥

# झ डा वं द न  वि धि

## राष्ट्रध्वज


आपल्या देशांत भगवा, हिरवा, लाल, तिरंगी असे विविध ध्वज अस्तित्वांत आहेत. परंतु फक्त तिरंगी ध्वजालाच 'राष्ट्रध्वज' म्हणून मानण्यांत येतें या ध्वजाच्या आकाराचें एक ठराविक प्रमाण आहे त्याचप्रमाणें त्याचे रंग व त्यांचा अनुक्रमहि ठरलेला आहे तसेंच राष्ट्रध्वज कोणत्या कापडाचा असावा व त्याच्यावर कोणतीं चिन्हें असावींत हेंही निश्चित ठरलेलें आहे.

ध्वजाची जी बाजू जमिनीला समांतर असते तिला ध्वजाची लांबी व ध्वजस्तंभाला जी बाजू समांत असते तिला ध्वजाची रुंदी अथवा उंची म्हणतात. ध्वजाची लांबी, रुंदीच्या दीडपट पाहिजे. राष्ट्रीय ध्वज तिरंगीच पाहिजे व त्या रंगांचा अनुक्रम वरून खालीं, केशरी–पांढरा–हिरवा असाच पाहिजे. ध्वजावर मधोमध अशोकचक्राचें चित्र असावें ध्वजाचें कापड कापसाचें, लोकरीचें अथवा रेशमाचें असलें तरी चालेल; परंतु तें हातानें कातलेल्या सुतापासून हातानें विणलेलें असलें पाहिजे. कापूस, लोकर अथवा रेशीम स्वदेशीच असलें पाहिजे अशा प्रकारच्या ध्वजासच राष्ट्राचें प्रतीक समजून 'राष्ट्रध्वज' असें म्हणतात

## ❀ ❀ झेंडा–चौक ❀ ❀

झेंडा चौकाची जागा विस्तृत, सपाट व स्वच्छ पाहिजे ध्वजस्तंभ गुळगुळीत, उंच व बारीक असावा. हा स्तंभ उंचीच्या १/६ इतका जमिनींत पुरावा म्हणजे वादळानें पडण्याची भीति नसते. झेंडाचौकाची आंखणी पुढील चित्रावरून चांगली समजून येईल मोकळ्या [illegible] [illegible] झेंडाचौकाची आंखणी करावी.

IRBK-0108199


निमंत्रित पाहुणे मंडळी
बँड पथक
पाहुणे मंडळी
अधिकारी वर्ग
निर्गम मार्ग
प्रवेश मार्ग
ध्वजी
ध्वज
अध्यक्ष
गायक गण
लहान मुले
स्त्रिया
सेवा - सैनिक
सेवा सैनिक
सेवा - सैनिक

# ❁ झेंडा फडकावण्याची पद्धत ❁

झेंडावंदनाचे दोन प्रकार आहेत. झेंडा-रोहण व झेंडा-अवतरण. झेंडारोहणाच्या वेळेला झेंडा अगादर गुंडाळून ठवलेला असतो; तर झेंडा-अवतरणाचे वेळीं तो गुंडाळून ठेवावा लागतो. झेंडा गुडाळण्याची एक ठराविक पद्धत आहे दोघांनीं झेंड्याचीं चार टोकें ताणून धरावीं व त्याची तीन पदरी अशी घडी करावी कीं, त्याचा केशरी रंग वर पांढरा मध्यें व हिरवा खालीं राहिला पाहिजे. घडी झाल्यावर त्याच्या चुण्या म्हणजेच बारीक आडव्या घड्या कराव्या. ध्वजस्तंभाला जो हूक अडकाविलेला असेल त्यांतून खूप लांब अशी पांढरी जाड दोरी ओवून घ्यावी. हुकावरून जी दोरी खाली येते तिला वरची दोरी व हुकाकडे जी दोरी जाते तिला खालची दोरी म्हणतात.

ध्वजाच्या चुण्या केल्यानंतर केशरी रंगाच्या वरच्या बाजूला एक पितळी कडी असते, त्या कडीला वरून खालीं येणारी दोरी बांधावी व हिरव्या रंगाकडच्या कडीला खालची दोरी बांधावी. खालच्या दोरीनें झेंड्याच्या चुण्यांना एक आठी विळखा द्यावा व त्याच दोरीचा आणखी कांहीं भाग हातांत घेऊन ती दोरी त्या आठीला अडकवून द्यावी, म्हणजे झेंड्याची गुडाळी तयार होते. खालची दोरी ओढली म्हणजे ही ध्वजाची गुंडाळी वर जाते आणि हुकाला अडकल्यावर दोन्ही दोऱ्या बांधून ठेवाव्या.

ध्वजारोहणाचे वेळीं ध्वजनीनें शिटी वाजवितांच सर्वांनीं आपल्या जागेवर येऊन उभें रहावें. ध्वजनीनें 'होशयार' हुकूम देतांच गायकांनीं 'वन्दे मातरम्' हें राष्ट्रगीत सुरू करावें. राष्ट्रगीत झाल्यावर ध्वजनीनें डावीकडे वळून एक पाऊल पुढें जावें व ध्वजस्तभाला बांधलेली दोरी सोडून वरची दोरी उजव्या हातानें ताणून धरून खालची दोरी डाव्या हातानें ताणावी. नंतर सर्वांना 'नमस्ते' हुकूम देऊन उजव्या हातांतील दोरीला जोरानें हिसका द्यावा म्हणजे झेंडा फडकूं लागतो झेंडा चांगला फडकूं लागल्यावर दोन मिनिटें सुरावर चांगला बँड वाजवावा.

बँड वाजवून झाल्यावर ‘कदम खोल’ चा हुकूम देऊन ध्वज हुकापर्यंत ओढून घ्यावा व ध्वजस्तंभाला बांधून ठेवून ‘दहिने मुख’ करून ‘होशयार’ चा हुकूम द्यावा लगेच सर्वांनीं झेंडा-गीत सुरू करावें ध्वजगीत संपल्यावर जयजयकार करावा ध्वजनीनें फक्त ‘भारत माता की’ एवढेच शब्द उच्चारावे व इतरांनीं ‘जय’ म्हणावें. पुन्हा ध्वजनीनें ‘वन्दे’ म्हणावें व इतरांनीं ‘मातरम्’ म्हणावें. नंतर ध्वजनीनें ‘कदम खोल’ चा हुकूम द्यावा. अध्यक्षांनीं प्रसंगानुरूप भाषण करावें तें झाल्यावर पुन्हा ‘होशयार’ हा हुकूम होतांच सर्वांनीं उजव्या बाजूला वळून रांगेनें एकामागून एक झेंडा चौकाच्या बाहेर निघून जावें

झेंडा-अवतरण सूर्यास्ताचे वेळीं करावयाचें असतें. यावेळीं झेंडा फडकत असतो व प्रथम ध्वजगीत म्हणून नंतर राष्ट्रगीत म्हणावयाचें असतें ‘नमस्ते’ हुकूम देत च झेंडा खालीं ओढा-वयाचा व नंतर खालीं उतरून, घडी करून अध्यक्षांजवळ द्यावयाचा

★




नव हिन्द राष्ट्र झेंड्या । प्रणामा घे या ॥ ध्रु० ॥
हिन्दभूमिच्या हिन्दि जनांच्या । स्वाभिमान चिन्हा ॥ १ ॥
स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरतीं । वा फडफडणाऱ्या ॥ २ ॥
‘स्वराज्य माझें-मीही त्याचा’ । जगता सांगाया ॥ ३ ॥
हिन्दपुत्र हे सिद्ध तुझ्यास्तव । प्राणही अर्पाया ॥ ४ ॥
नव्या मनूचे शिलेदार हे । नमिती तुज राया ॥ ५ ॥

# आमचा राष्ट्रीय ध्वज

## इतिहास ● ● ● १

फार प्राचीनकाळीं आजच्याप्रमाणें आपला भारत देश स्वतंत्र होता त्यावेळीं देशांतील स्वतंत्र राष्ट्राचे ध्वज डौलानें फडकत होते. रामराज्याच्या वेळीं किंवा पांडवांच्या काळीं त्याचे विजयध्वज फडकत असले पाहिजेत. मराठ्यांचा भगवा झेंडा एकेकाळीं अटकेपार गेला होता. परंतु हिंदुस्थानांत ब्रिटिशांचें साम्राज्य सुरू झाल्यापासून स्वतंत्र भारतीय ध्वजाची कल्पनाच समूळ नष्ट झाली. निरनिराळ्या साम्राज्यनाशाबरोबर त्यांचे ध्वजही नाहींसे होऊन, त्यांची जागा युनियन जॅक'नें पटकाविली. युनियन जॅकनें देशांत एकतत्री राज्य प्रस्थापित केलें, पण त्याबरोबरच परकीय राजसत्तेची म्हणजेच स्वकीयांच्या गुलामगिरीची ती निशाणी आहे याची हिंदी जनतेला अत्यंत प्रखरपणें त्याच युनियन जॅकनें जाणीव करून दिली. ही जाणीव म्हणजेच बंडखोरीच्या भावनेच्या बीजाला फुटलेला पहिला अंकुर होय !

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. या राष्ट्रीय सभेच्या पहिल्या वीस वर्षांचे कारकीर्दींत प्रागतिक पक्षाचें प्राबल्य असल्यामुळें त्यावेळच्या राष्ट्रीय सभेच्या आकांक्षा देखील राज्यकारभारांतील किरकोळ सुधारणांच्या मागणीपलीकडे नव्हत्या. राष्ट्रीय सभेच्या या अवस्थेंत 'राष्ट्रध्वज ही कल्पनाच कुणाला सुचली नाहीं. इतकेंच नव्हे, तर जहाल पक्षानें राष्ट्रीय सभा काबीज केल्यावरही, कांहीं काळ म्हणजे सुमारें १९२० सालपर्यंत राष्ट्रीय सभेचा मंडप देखील युनियन जॅकनेंच सुशोभित केला जाई.

राष्ट्रीय सभेनें 'स्वराज्य' शब्दाची घोषणा केल्याबरोबर आपणाला स्वराज्य पाहिजे तर स्वराज्याचें निशाणही असलें पाहिजे, ही कल्पना आपल्या देशवासीयांच्या मनांत रुजूं लागली. 'युनियन जॅक' हें निशाण ब्रिटिशांचें होतें. त्यानीं त्यांत, आपल्या भावनेप्रमाणें व कल्पनेप्रमाणें रंगांच्या पट्ट्या बसविलेल्या होत्या. भारतीयांच्या 'ध्वजा' संबंधींच्या 'राष्ट्रीय आकांक्षा' पूर्ण करण्याजोगें त्या ध्वजांत कांहीं नव्हतें. युनियन जॅकला राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें कितीही महत्त्व असलें तरी जागृत झालेल्या भारतीयांच्या दृष्टीनें त्यास भारतीयांच्या स्वतंत्र राष्ट्रीय ध्वजाचें महत्त्व येणें शक्य नव्हतें. भारताचा स्वतंत्रच ध्वज असला पाहिजे ! आणि आतां आपला देश स्वतंत्र झाला असल्यामुळें आपल्या या स्वतंत्र राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा वाढली आहे.

●

## राष्ट्रध्वजाची पहिली कल्पना ● २

इंग्लंडमध्यें असलेले कांहीं क्रांतिकारक हिंदी तरुण लंडनमधील "इंडिया हाउसमध्यें" रात्रीच्या वेळीं एकत्र जमत असत. तेथें ते एका खोलीमध्यें शेगडीच्याभोंवतीं बसून अफीमाप्रमाणें मनांत स्वराज्याचे मनोरे बांधीत असत. भावी स्वराज्याचें निशाण कसें असावें यावरही त्यांची चर्चा होत असे.

पाश्चात्य लोक 'हिंदी राष्ट्राचा ध्वज कसा आहे ?' असा प्रश्न त्यांना वारंवार विचारीत. त्यावेळीं या तरुणाना लज्जेनें मान खालीं घालण्याचा प्रसंग येई ! या मानसिक टोंचणीमुळें या तरुणांनीं हिंदी राष्ट्राचाही एक स्वतंत्र ध्वज असणें अवश्य आहे असें ठरविलें व आपल्या कल्पनेप्रमाणें एक 'हिंदी राष्ट्रध्वज' तयारही केला.

अनुक्रम विभाग क्रमांक

हा राष्ट्रध्वज १९०६ मध्यें तयार करण्यांत आला. तो आजच्या राष्ट्रध्वजासारखाच तिरंगी होता. खालची पट्टी हिरवी, मधली पांढरी व वरची भगव्या रंगाची होती. हिरवा रंग यश व बलसामर्थ्य यांचा निदर्शक म्हणून समजला जाई. "यावच्चंद्रदिवाकरौ" आमचा हिंदुस्थान स्वतंत्र राहील हें दर्शविणारीं सूर्य व चंद्र यांचीं चिन्हें, हिरव्या पट्टीवर डाव्या बाजूस सूर्य व उजव्या बाजूस चंद्र याप्रमाणें काढलेलीं होतीं. ज्या-करितां शेंकडों तरुणांनीं आपलीं डोकीं फोडून घेतलीं व फांसावर लटकतांनाही ज्याचा नामोच्चार केला तो 'वंदे मातरम्' हा राष्ट्रमंत्र मधल्या पांढऱ्या पट्टीवर लिहिलेला होता. वरच्या पट्टीवर आठ कमळांचीं चित्रें काढलेलीं असत. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें ताऱ्यांच्या रूपानें अमेरिकेच्या निशाणावर असतात. तेव्हां त्याप्रमाणें अखंड हिंदुस्थान तयार करणारे हिंदुस्थानांतल्या त्यावेळच्या परिस्थितिप्रमाणें भाषावार असे जे आठ प्रांत कल्पिले होते, त्या आठ प्रांतांचीं हीं आठ कमळें निदर्शक होतीं. अमेरिकन ताऱ्यांऐवजीं कमल–पुष्प हें हिंदुस्थानचें वैशिष्ट्यनिदर्शक असल्यामुळें त्याची योजना योग्य होती.

त्यावेळीं जर्मनीमध्यें आंतरराष्ट्रीय समाजवाद्यांचें एक संमेलन भरावयाचें होतें. प्रत्येकानें आपल्या राष्ट्राचें निशाण आणावें असें सर्वांना कळविण्यांत आलें होतें. श्री. हेमचंद्र दास यांनीं रात्रभर जागून हें निशाण शिवून तयार केलें व फ्रान्समधील क्रांतीकारकांत समाविष्ट झालेल्या मादाम कामा या पारशी स्त्रीनें तें पोलक्यांत लपवून जर्मनींत या संमेलनाला नेलें व बर्लिनमधील प्रचंड समुदायापुढें भाषण करून, 'वंदे मातरम्'च्या गर्जनेंत हा तिरंगी ध्वज फडकावला. त्यावेळीं त्या म्हणाल्या,

"स्वतंत्र हिंदुस्थानचा हा ध्वज आतांच जन्माला येत आहे. त्याला वंदन करा!"

त्याप्रमाणें तेथील जर्मनांनीं 'वंदे मातरम्' असें म्हणून त्या ध्वजाला अभिवादन केलें आणि जर्मन राष्ट्राच्या बँडनेंही त्याला सलामी दिली. ह्याच भारतीय राष्ट्रध्वज बनविण्याचा पहिला प्रयत्न होय !

परदेशस्थ हिंदी तरुणांनीं हा राष्ट्रध्वज म्हणून तयार केला असला, तरी त्या काळच्या परिस्थितिच्या मानामुळें हिंदुस्थानांत त्याचा प्रसार झाला नाहीं. युनियन जॅकची संवय झालेल्या हिंदी डोळ्यांना व मनाला वेगळा भारतीय ध्वज बनविणें किंवा बनलेला पाहाणें हें तत्कालीन राजनिष्ठेच्या कल्पनेला खपलेंही नसेल ! त्यावेळीं देशाची परिस्थितिच अशी होती कीं, 'वंदे मातरम्' चा उच्चार करणें देखील राजद्रोहात्मक गणलें जात असे. मग अशा प्रकारचा ध्वज आपल्या देशांत राजरोसपणें वावरलेला पाहावयास मिळणें कसें शक्य होणार ? त्यामुळें हा ध्वज भारतीय राष्ट्रध्वज म्हणून तयार झाला असला, तरी तो प्रयत्न क्रांतिकारक या सदराखालींच गणला गेला व फसला !

●

## राष्ट्रध्वजाचा दुसरा प्रयत्न ● ● ● २

१९१६ सालच्या 'इंडियन होमरूल' च्या चळवळीच्या काळांत भारतीय राष्ट्रध्वज बनविण्याचा दुसरा प्रयत्न झाला. यावेळच्या कांहीं देशभक्तांनीं तांबड्या व हिरव्या रंगाच्या नऊ पट्ट्यांचें एक निशाण तयार केलें. या निशाणांत तांबड्या पांच व हिरव्या चार पट्ट्या सम-विषम पद्धतीनें बसविल्या असून या नऊ पट्ट्यांपैकीं पहिल्या पांच पट्ट्यांवर 'सप्तर्षि' दर्शक सात तारे, व वरील चार पट्ट्यांवर डाव्या बाजूस 'युनियन जॅक' ची आकृति व उजव्या बाजूला चंद्रकोर व त्यावर तारा काढलेला असे. या नऊ पट्ट्या, देशांतील प्रमुख असे नऊ राजकीय विभाग दर्शविणाऱ्या होत्या असें म्हणतात. हें

निशाण राष्ट्रध्वज म्हणून तयार झालें असलें, तरी त्यावेळच्या चळवळांत 'राष्ट्रध्वज' या वस्तूस प्राधान्य देण्याचें कोणा राष्ट्रीय पुढाऱ्याच्या मनानें फारसें घेतलें नाहीं. लोकमान्य टिळकांनीं या नऊ पट्टयांच्या राष्ट्रध्वजाची प्रशंसा केली होती. पण इतर चळवळींच्या प्रश्नांपुढें हा राष्ट्रध्वजाचा विषय त्यावेळीं कोणी फारसा धसास लावला नाहीं. त्यामुळें राष्ट्रध्वजाचा हा दुसरा प्रयत्न तितकासा सफल झाला नाहीं.

●

## तिरंगी राष्ट्रध्वजाची उत्पत्ति ● ● ४

स्वदेशीच्या चळवळींत भारताचा स्वतंत्र राष्ट्रध्वज असावा हा विचार अनेकांचे मनांत घोळावयास लागला व कांहींनीं त्या दृष्टीनें प्रयत्न करण्यास सुरवात केली. कांहीं लोक निशाणांचे अनेक नमुने तयार करून, ते राष्ट्रीय सभेची पर्वणी साधून, तेथें जमलेल्या पुढाऱ्यांचे पुढें ठेवीत. पण त्यापासून निष्पत्ति अशी कांहींच झाली नाहीं.

१९२१ सालीं देशांत असहकाराची मोठी लाट उसळली होती. पदव्यांचा त्याग, शाळा—कॉलेजें सोडणें, वकिली व कोर्टें यांवर बहिष्कार, अशी प्रचंड चळवळ देशभर सुरू झालेली होती. या चळवळीबरोबरच स्वतःचा ध्वज हवासा वाटणें क्रमप्राप्तच होतें. अशा परिस्थितींत राष्ट्रध्वजासंबंधींच्या तिसऱ्या प्रयत्नास सुरवात झाली. हा प्रयत्न अधिक नेटाचा होऊन तो यशस्वी झाला.

१९२१ च्या मार्च महिन्यांत, बेझवाडा येथें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत राष्ट्रध्वज तयार करण्यासंबंधीं विचार करण्यांत आला. कांहीं मंडळींनीं महात्मा गांधीकडे राष्ट्रध्वजाकरितां आग्रहाचे प्रयत्न सुरू केले. यावेळीं खादीची चळवळ प्रामुख्यानें पुढें आली होती,

व हातसुताच्या महत्त्वामुळें 'चरखा' जनतेच्या डोळ्यासमोर उभा राहिला होता. त्यामुळें ध्वजावर चरख्याचें चित्र असावें, अशी एक कल्पना, एकानें गांधीजींना सुचविली.

देशभर फडकत राहणाऱ्या राष्ट्रध्वजावर चरखा रेखाटल्यास तो लोकांचे डोळ्यासमोर अखंड राहणार, ही कल्पना महात्माजींना तावडतोब पटून त्यांनीं चरखांकित चिन्हाचा एक तिरंगी ध्वज तयार करविला. प्रथम हिंदु व मुसलमान यांच्या ऐक्याच्या दृष्टीनें तांबडा व हिरवा असे दोनच रंग ध्वजांत ठेवण्यात आले होते, पण पुढें इतर धर्मांच्या दृष्टीनें पांढऱ्या रंगाची पट्टी त्यांत घालण्यांत आली व भारतवासीयांचा प्रमुख असा सूत काढणें हाच प्राचीन घरगुती धंदा होय, याचें दर्शक म्हणून 'चरखा' या चिन्हास त्यांवर स्थान देण्यांत आलें. या ध्वजाची खालची पट्टी लाल रंगाची असून, मधली हिरव्या रंगाची व वरची पांढऱ्या रंगाची होती आणि या तीनही पट्टयांवर पसरलेलें असें चरख्याचें चित्र होतें. १९२१ सालीं अहमदाबाद येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या मंडपावर हा तिरंगी झेंडा प्रथमच फडकूं लागला आणि यावेळेपासून राष्ट्रीय कार्यक्रमामधून त्याचा शिरकाव झाला.

●

## नवा तिरंगी राष्ट्रध्वज ● ● ५

सन १९३१ सालीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें राष्ट्रध्वजाचा प्रश्न प्रत्यक्षपणें हातीं घेऊन, सात सभासदांची एक कमिटी नेमली व सर्वसम्मत असा एक राष्ट्रध्वज तयार करण्याची कामगिरी या कमिटीकडे सोंपविली. या कमिटीनें प्रांतिक कमिट्या व अनेक राष्ट्रीय पुढारी यांचा सल्ला घेऊन एक ध्वज तयार केला. ध्वज—कमिटीनें तयार केलेला हा ध्वज सबंध केशरी रंगाचा असून, त्यावर वरील डाव्या कोपऱ्यांत चरख्याचें चित्र होतें. परंतु कमिटीनें तयार केलेला हा एकरंगी ध्वज वर्किंग कमिटीसच मूलतः पसंत पडला नाहीं.

त्यानंतर वर्किंग कमिटीनें स्वतःच हें काम हातीं घेतलें व विचारपूर्वक पूर्वीच्या तिरंगी ध्वजांत कांहींसा बदल करून नवीन राष्ट्रध्वज तयार केला. वर्किंग कमिटीनें बनविलेल्या या ध्वजांत वरून खालीं, क्रमानें केशरी, पांढरा व हिरवा असे तीन रंग असावे व मधल्या पांढऱ्या पट्टयावर निळया रंगांत चरख्याचें चित्र असावें असें ठरलें. पूर्वीच्या लाल रंगाचे जागीं केशरी रंग आला व रंगांच्या स्थानांची अदलाबदल करण्यांत आली, एवढाच त्यांत फरक करण्यांत आला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें सन १९३१ च्या ८ ऑगस्टला मुंबई येथील बैठकींत रीतसर ठराव पास करून, वर्किंग कमिटीनें तयार केलेल्या या ध्वजास मान्यता दिली. तेव्हांपासून १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत 'भारतीय राष्ट्रध्वज' म्हणून हा तिरंगी ध्वज फडकत होता.

●

## राष्ट्रध्वजांतील रंग ● ● ६

१९२१ सालीं महात्मा गांधींनीं जेव्हां हा तिरंगी राष्ट्रध्वज बनविला, त्यावेळीं ध्वजांतील रंगांच्या पट्टयांच्या मुळाशीं जातिविशिष्टतेची कल्पना होती. त्यावेळीं देशभर उद्भवलेल्या असहकार चळवळीच्या भावनेच्या भरांत ही जातिविशिष्ट कल्पना दबून राहिली असली, तरी चळवळीची लाट ओसरतांच राष्ट्रध्वजांतील रंग जातिविशिष्ट असल्याचा वाद उपस्थित झाला. ध्वजांतील तीन रंगांनीं सर्व जातींच्या लोकांचें समाधान होणें शक्य नव्हतें व जातिपरत्वें रंगांच्या पट्टया बसवून ध्वज तयार करणें हें केवळ विचित्रच नव्हे, तर अशक्यही होतें. त्यामुळें ध्वजाच्या रंगांतील मूळ जातिविशिष्ट कल्पनाच नष्ट करून त्या जागीं गुणविशिष्ट कल्पना बनविण्याचें कार्य हातीं घेणें भाग पडलें.

ध्वजांतील जातिविशिष्ट रंगांबद्दल पुष्कळांनीं काँग्रेसकडे तक्रारी नेल्या, पण काँग्रेसनें त्या वेळीं रीतसर राष्ट्रध्वजाचा प्रश्नच हातीं घेतलेला नसल्यामुळें त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. परंतु १९३१ सालीं काँग्रेसनें तिरंगी राष्ट्रध्वजाला मान्यता दिली त्याच वेळीं राष्ट्रध्वजांतील हे तीन रंग पुढीलप्रमाणें गुणविशिष्ट आहेत असें जाहीर करण्यांत आलें.

केशरी—धैर्य व त्याग
पांढरा—सत्य आणि शांति
हिरवा—विश्वास व प्रताप

'चरखा' ही खूण व श्रीमंत गरीब भारतीयांना एके ठिकाणीं करणारी शक्ति आहे.

●

## नवा राष्ट्रध्वज ● ● ● ७

स्वतंत्र भारताची राज्यघटना ठरविण्यासाठीं घटनासमिती नेमण्यांत आली होती. या घटना समितीनें अशोकचक्रांकित राष्ट्रध्वजाला मान्यता दिली आहे. या नव्या राष्ट्रध्वजांतील तीन रंग हे स्वातंत्र्याचें सत्य, शांतीची शुचिता व समृद्धीचें सौंदर्य व्यक्त करणारे असून, त्यावरील अशोकचक्र हा दरिद्रिनारायणाचा, त्याचप्रमाणें प्रगतीपर सद्धर्मपालनाचा निदर्शक आहे. प्रखर भूतकाळ आणि उज्वल भविष्यकाल या दोन्हीकडे एकाच वेळीं सर्व हिंदी जनतेचें लक्ष वेधून घेणाऱ्या या ध्वजाला वंदन करतांना, स्वतंत्र हिंदी राष्ट्राचे पहिले मुख्यप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं घटना परिषदेपुढें या ध्वजाला मान्यता देणारा ठराव मांडतेवेळीं जें भाषण केलें त्या भाषणांत राष्ट्राच्या भावना एकनिष्ठ झालेल्या आढळतात. पं. जवाहरलाल नेहरू आपल्या भाषणांत म्हणाले, "आज मी आपल्या मान्यतेसाठीं सादर केलेल्या या ध्वजामध्यें राष्ट्राच्या इतिहासांतील एका लहानशा कालखंडाचा इतिहास सांठविलेला आहे. पण या अल्पकालावधींतच आपण अनेक शतकांचा अनुभव घेतलेला आहे. जीवन जगण्याला महत्व नसून त्या जीवनांतील कर्तबगारीला महत्व आहे. त्याचप्रमाणें राष्ट्राच्या अस्तित्वाला महत्व नसून, त्या राष्ट्रानें कर्तबगारी काय केली याला महत्व आहे. आणि मी अभिमानानें सांगूं शकतो कीं या पंचवीस वर्षांतील हिंदुस्थानचें जीवन आणि त्यानें जनतेमध्यें निर्माण केलेल्या



भावना या अमर्याद महत्वाच्या आहेत. या कर्तबगारीनें राष्ट्राचा इतिहास उज्वल झाला असून परंपरेची कीर्ति वाढविली आहे. या विशाल राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं चालविलेल्या लढ्यांतील जयापजयाच्या प्रसंगांची यावेळीं आठवण झाल्याखेरीज रहात नाही. विजयाच्या वेळीं आम्ही याच ध्वजाकडे अभिमानानें पाहिलें आहे. आणि पराजयाच्या वेळींहि याच ध्वजाकडे पाहून आम्ही पुनः स्फूर्ति मिळविली आहे. आमच्यापैकीं जे अनेक सहकारी आज येथें नाहींत त्यांनीं या ध्वजाचें रक्षण केलें आणि त्यांपैकीं कित्येकांनीं ध्वजासाठीं धारातीर्थी देह ठेवतेवेळीं हा ध्वज रक्षणासाठीं आपल्या सहकाऱ्यांच्या हवालीं केला.

"अखेर आज हा विजयाचा दिवस उगवला आहे. या देशावर सत्ता गाजविणाऱ्या प्रबळ साम्राज्यशाहीनें आपल्या सत्तेचा शेवट करण्याचें ठरविलें आहे, हा कांहीं लहान सहान विजय नव्हे. तो आमचा उद्देश होता आणि तो आम्हाला ज्या स्वरूपांत पाहिजे होता तसा नसला तरी सफल झाला आहे अनेक आपत्ती आपल्या सभोंवतीं असतांना सुद्धां राष्ट्रानें जी सफलता मिळविली आहे तिचें गुणगान करतांना मला खेद वाटत नाहीं. या सफलतेनें त्या स्वातंत्र्याचें निदर्शक म्हणून या ध्वजाला आज

आपण मान्यता देणें योग्य आहे. खरें पाहतां या ध्वजाचा स्वीकार करण्यासाठीं औपचारिक ठरावाची आवश्यकता नाहीं. कारण जनतेनें आपल्या स्वार्थत्यागानें यापूर्वींच मान्यता देऊन त्याचा स्वीकार केला आहे. हा ध्वज कोणा साम्राज्याचा, साम्राज्यशाहीचा किंवा दुसऱ्यावर वर्चस्व गाजविणाऱ्यांचा निदर्शक नाहीं. हा ध्वज आपल्या स्वातंत्र्याचा, त्याचप्रमाणें जे जे तो पहातील त्या सर्वांच्या स्वातंत्र्याचें प्रतीक आहे. ”

हिंदुस्थानची भावी राज्यघटना तयार करीत असलेल्या घटना परिषदेनें या ध्वजाला सर्व राष्ट्राच्या वतीनें एकमुखानें आणि महात्मा गांधींच्या जयजयकारानें मान्यता दिली. या घटना परिषदेंत सर्व जातींचे, दर्जाचे, वर्गांचे, आणि संस्थानांचेहि प्रतिनिधि आहेत. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख, वगैरे सर्व समाजांच्या प्रतिनिधींनीं हा ध्वज आपल्या राष्ट्राचा, आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें प्रतीक असून, त्याचें रक्षण करणें, त्याची इभ्रत राखणें व त्याची कीर्ति दिगंवत पसरेल असें वर्तन करणें हें प्रत्येक हिंदी नागरिकाचें कर्तव्य आहे असें जाहीर केलें आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीचें प्रतीक असलेला युनियन जॅक ता. १५ ऑगस्ट रोजीं खालीं उतरला. तो या देशांत पुनः कधींही अधिकाराच्या जागेवर दिसणार नाहीं. त्याची जागा घेणारा आपला नीलचक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज हा आपल्या भूतकालांतील सर्व राष्ट्रीय भावना आणि भविष्यकालाबद्दलच्या सर्व आशाआकांक्षा पूर्णपणें व्यक्त करणारा आहे. जगांत पुढें पाऊल टाकणाऱ्या नव्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या स्वतंत्र नागरीकांमध्यें विश्वास, तेज आणि स्फूर्ति निर्माण करण्याचें सामर्थ्य या ध्वजामध्यें आहे व म्हणूनच प्रत्येक हिंदी नागरिक आदरानें त्याला वंदन करील !

# ध्वजाविषयीं लक्षांत ठेवावयाच्या मुख्य गोष्टी ● 

राष्ट्रध्वज ही एक अतिशय पवित्र व आदरणीय वस्तु आहे. त्याचा योग्य तो सन्मान ठेवला पाहिजे. ध्वज म्हणजे घरांतील इतर कपड्यांप्रमाणें कांहीं सामान्य कपडा नाहीं. आपल्या प्राणापेक्षाही त्याला अधिक जपलें पाहिजे ! म्हणून त्याच्याविषयीं पाळावयाच्या मुख्य गोष्टी खालीलप्रमाणें आहेत. त्या प्रत्येकानें अवश्य पाळल्या पाहिजेत.

[ १ ]

ध्वज घरांत कोठेंतरी जमिनीवर ठेवूं नये. तो सुरक्षित अशा पवित्र ठिकाणीं ठेवावा. चांगल्या पिशवींत बंद करून ठेवला तरी चालेल. हातरुमालाप्रमाणें हात पुसण्यासाठीं त्याचा उपयोग करूं नये.

[ २ ]

ध्वजाला जमिनीचा स्पर्शसुद्धां होतां कामा नये. त्याची घडी करावयाची असली तरी जमिनीवर करूं नये.

[ ३ ]

फाटेलला, जुना अगर रंग उडालेला ध्वज फडकवूं नये. असा ध्वज एखाद्या संन्याशाप्रमाणें सन्मानपूर्वक पुरून टाकावा किंवा विधीपूर्वक जाळावा. दुसऱ्या कोणत्याही कामीं त्याचा उपयोग करूं नये.

[ ४ ]

कांहीं ठिकाणीं ध्वज रात्रंदिवस फडकत ठेवावे लागतात. असे ध्वज दर महिन्याला बदलले पाहिजेत. दररोज सूर्योदयाला ध्वजारोहण व सूर्यास्ताला ध्वजा-अवतरण करून विधीपूर्वक झेंडावंदन करावें.

[ ५ ]

ध्वज जेथें फडकत असतो तेथें ध्वजरक्षक असावा. त्याला यथावकाश बदलणेंही आवश्यक आहे.

आपण मान्यता देणें योग्य आहे. खरें पाहतां या ध्वजाचा स्वीकार करण्यासाठीं औपचारिक ठरावाची आवश्यकता नाहीं. कारण जनतेनें आपल्या स्वार्थत्यागानें यापूर्वींच मान्यता देऊन त्याचा स्वीकार केला आहे. हा ध्वज कोणा साम्राज्याचा, साम्राज्यशाहीचा किंवा दुसऱ्यावर वर्चस्व गाजविणाऱ्यांचा निदर्शक नाहीं. हा ध्वज आपल्या स्वातंत्र्याचा, त्याचप्रमाणें जे जे तो पहातील त्या सर्वांच्या स्वातंत्र्याचा प्रतीक आहे. ”

हिंदुस्थानची भावी राज्यघटना तयार करीत असलेल्या घटना परिषदेनें या ध्वजाला सर्व राष्ट्राच्या वतीनें एकमुखानें आणि महात्मा गांधींच्या जयजयकारानें मान्यता दिली. या घटना परिषदेंत सर्व जातींचे, दर्जाचे, वर्गाचे, आणि संस्थानांचेहि प्रतिनिधि आहेत. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख, वगैरे सर्व समाजांच्या प्रतिनिधींनीं हा ध्वज आपल्या राष्ट्राचा, आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें प्रतीक असून, त्याचें रक्षण करणें, त्याची इभ्रत राखणें व त्याची कीर्ति दिगंवत पसरेल असें वर्तन करणें हें प्रत्येक हिंदी नागरिकाचें कर्तव्य आहे असें जाहीर केलें आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीचें प्रतीक असलेला युनियन जॅक ता. १५ ऑगस्ट रोजीं खालीं उतरला. तो या देशांत पुनः कधींही अधिकाराच्या जागेवर दिसणार नाहीं. त्याची जागा घेणारा आपला नीलचक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज हा आपल्या भूतकालांतील सर्व राष्ट्रीय भावना आणि भविष्यकालाबद्दलच्या सर्व आशाआकांक्षा पूर्णपणें व्यक्त करणारा आहे. जगांत पुढें पाऊल टाकणाऱ्या नव्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या स्वतंत्र नागरीकामध्यें विश्वास, तेज आणि स्फूर्ति निर्माण करण्याचें सामर्थ्य या ध्वजामध्यें आहे व म्हणूनच प्रत्येक हिंदी नागरिक आदरानें त्याला वंदन करील !

# ध्वजाविषयीं लक्षांत ठेवावयाच्या मुख्य गोष्टी ● ८

राष्ट्रध्वज ही एक अतिशय पवित्र व आदरणीय वस्तु आहे. त्याचा योग्य तो सन्मान ठेवला पाहिजे. ध्वज म्हणजे घरांतील इतर कपड्यांप्रमाणें कांहीं सामान्य कपडा नाहीं. आपल्या प्राणापेक्षाही त्याला अधिक जपलें पाहिजे ! म्हणून त्याच्याविषयीं पाळावयाच्या मुख्य गोष्टी खालीलप्रमाणें आहेत. त्या प्रत्येकानें अवश्य पाळल्या पाहिजेत

[ १ ]

ध्वज घरांत कोठेंतरी जमिनीवर ठेवूं नये. तो सुरक्षित अशा पवित्र ठिकाणीं ठेवावा. चांगल्या पिशवींत बंद करून ठेवला तरी चालेल. हातरुमालाप्रमाणें हात पुसण्यासाठीं त्याचा उपयोग करूं नये.

[ २ ]

ध्वजाला जमिनीचा स्पर्शसुद्धां होतां कामा नये. त्याची घडी करावयाची असली तरी जमिनीवर करूं नये.

[ ३ ]

फाटेलला, जुना अगर रंग उडालेला ध्वज फडकवूं नये. असा ध्वज एकाद्या सन्याशाप्रमाणें सन्मानपूर्वक पुरून टाकावा किंवा विधीपूर्वक जाळावा. दुसऱ्या कोणत्याही कामीं त्याचा उपयोग करूं नये.

[ ४ ]

कांहीं ठिकाणीं ध्वज रात्रदिवस फडकत ठेवावे लागतात. असे ध्वज दर महिन्याला बदलले पाहिजेत. दररोज सूर्योदयाला ध्वजारोहण व सूर्यास्ताला ध्वजा-अवतरण करून विधीपूर्वक झेंडावंदन करावें.

[ ५ ]

ध्वज जेथें फडकत असतो तेथें ध्वजरक्षक असावा त्याला यथावकाश बदलणेंही आवश्यक आहे.

[ ६ ]

ज्याप्रमाणें दिवा खालीं पडला तर अशुभ समजतात, त्याचप्रमाणें ध्वज हातांतून किंवा स्तंभावरून खालीं पडला तर अशुभ समजावें.

[ ७ ]

ध्वज फडकविल्यानंतर पाऊस पडण्याचा संभव असल्यास त्याला विधीपूर्वक खालीं उतरून पाऊस गेल्यावर पुन्हा फडकवावा.

[ ८ ]

ध्वज स्तंभाच्या मध्यावर असणें हें सुतकासारखें आहे. दुःख-प्रदर्शन करण्याचे वेळीं मात्र ध्वज स्तंभाच्या मध्यावर ठेवावा.

[ ९ ]

प्रत्येक राष्ट्रांत तेथील राष्ट्रध्वजाला प्रमुख स्थान दिलें जातें व इतर राष्ट्रांचे ध्वज त्याच्याखालीं सुरक्षित ठेवले जातात. आपल्या राष्ट्रध्वजाचा सन्मान करून इतर ध्वजांचा अपमान करावा असा मात्र याचा अर्थ नाहीं. अन्य राष्ट्रध्वजांना दुसऱ्या वर्गाचा मान देणें हा आंतरराष्ट्रीय नियम आहे. दुसऱ्या ध्वजाला जाळणें, फाडणें किंवा त्याचा अपमान करणें हा भयंकर मोठा गुन्हा आहे. आपल्या ध्वजाचा कोणताही अपमान आपण सहन करतां कामा नये.

[ १० ]

कोणत्याही सभेंत वक्ता किंवा अध्यक्ष यांनीं ध्वजासमोर उभें राहून भाषण करूं नये. ध्वज डाव्या बाजूला उंच फडकत असावा.

[ ११ ]

मोटारीच्या पुढच्या तोंडावर योग्य आकाराचा ध्वज मजबूतपणें लावावा. तो कोणत्याही कारणानें पडतां कामा नये. मोटारीच्या दुसऱ्या कोणत्याही भागावर ध्वज लावूं नये.

[ १२ ]

ध्वजावर अशोकचक्राशिवाय दुसरें कोणतेंही चिन्ह, अक्षर, चित्र किंवा वेलबुट्टी काढूं नये.

ग्रं. क्र. ... ८१९९ दि ...
वि. ...

## सेवादल व राष्ट्रध्वज ● ● ● १

नागपूरच्या झेंडा सत्याग्रहांत शिक्षा होऊन तुरुंगात गेलेल्या कांहीं सत्याग्रही पुढाऱ्यांच्या मनांत भारतीय स्वयंसेवकदल स्थापन करण्याची कल्पना उत्पन्न झाली व त्यांनीं तेथेंच दलाच्या कार्याची मुहूर्तमेढ रोविली. तुरुंगांतून मुक्त झाल्यावर या पुढाऱ्यांनीं ‘ हिंदुस्थानी सेवादल ’ या संस्थेची स्थापना केली. या संस्थेनें राष्ट्रध्वजाची लोकप्रियता देशाच्या कोनाकोपऱ्यांत सुद्धां वाढवून तद्द्वारां तरुणांत नवचैतन्य उत्पन्न केलें. तसेंच मासिक ध्वजवंदनाचा कार्यक्रम १९२८ सालीं या दलानें सुरू केला आणि तो ‘ राष्ट्रसेवादल ’ व काँग्रेस यांनीं आतां आपलासा केला आहे. भारतीय राष्ट्रध्वजाचा व सेवादलाचा संबंध भरतखंडाच्या भावी इतिहासकाराला तोडता येणार नाहीं !

सध्यां ‘ राष्ट्रसेवादल ’ ही संस्था मासिक झेंडावंदनाचा कार्यक्रम उत्तम प्रकारें पार पाडीत असते. या सेवादलाच्या शाखा सर्वत्र पसरल्या असल्यामुळें या राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठाही सर्वत्र वाढलेली आहे.

●

## झेंडावंदन व ध्वजदिन ● ● १

कोकोनाडा येथें काँग्रेसनगराच्या आवारांत राष्ट्राध्यक्षांच्या हस्तें प्रथमच ध्वज उभारण्याचा समारंभ झाला. नंतर १९२४ सालीं बेळगांव येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळीं पद्धतशीर व शिस्तपूर्ण अशा ध्वजवंदनविधीचा उपक्रम सुरू झाला. तेव्हांपासून १९२६ च्या कलकत्त्याच्या बैठकीशिवाय प्रत्येक काँग्रेसच्या अधिवेशनापूर्वीं हा विधि ठराविक पद्धतीनें काँग्रेसनगरात साजरा केला जातो.

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारीं सकाळीं बरोबर आठ वाजतां झेंडावंदन करण्यांत यावें असें ठरलेलें आहे. त्याप्रमाणें सध्यां देशांतील हजारों ठिकाणीं झेंडावंदन होत असतें व देशांतील लक्षावधि लोक हजर राहून झेंड्याला सप्रेम व अत्यंत आदरपूर्वक वंदन करतात.

एप्रिल २६ हा दिवस 'ध्वजादिन' म्हणून पाळण्यांत यावा व अत्यंत धैर्यानें, उत्साहानें, स्वार्थाकडे बिलकूल लक्ष न देतां, ज्या ज्या लोकांनीं स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घेतला, त्या सर्वांचें त्या दिवशीं स्मरण करावें असें आपल्या पुढाऱ्यांनीं ठरविलें असून त्याप्रमाणें हा ध्वजादिन दर-वर्षीं उत्साहानें साजरा केला जातो. त्यामुळें राष्ट्रध्वजाविषयीं जनतेच्या मनांत प्रेम उत्पन्न होऊन ध्वजाबद्दलची पूज्य भावना वाढत चालली आहे.

●

## राष्ट्रध्वजाचें महत्व ● ● १०

अखिल भारताची जी एकमेव संस्था 'राष्ट्रीय महासभा' त्या महा-सभेनें हा ध्वज राष्ट्रध्वज म्हणून मान्य केला आहे. हिंदुस्थानांतील पक्षभेद मावळेतोंपर्यंत, ध्वजासंबंधींचे वादविवाद बंद पडणार नाहींत हें खरें, आणि पुढेंमागें आजच्या राष्ट्रध्वजाचें स्वरूप देखील कालमानपरि-स्थितिप्रमाणें बदलणार नाहीं असें कोण म्हणेल ? परंतु आज तरी भारतीय राष्ट्रीय सभेनें मान्यता दिलेल्या या तिरंगी राष्ट्रीय ध्वजासच आम्ही मान देणें हेंच योग्य होय.

आपल्या राष्ट्रध्वजाकरितां राष्ट्राराष्ट्रांत युद्धें होतात व त्याकरितां देशांतील तरुण, प्रसंगीं प्राणाचेंही मोल देण्यास कचरत नाहींत; जगाचा इतिहास चाळणाऱ्याला अशा प्रकारचीं शेंकडों उदाहरणें सांपडतील. आपल्या भारतीय राष्ट्रध्वजाकरितां इतर राष्ट्रांशीं झगडण्याचा प्रसंग आपल्यावर अद्याप आलेला नसला तरी १९२३ च्या एप्रिल महिन्यांत नागपूर येथें झेंडासत्याग्रह सुरू झाला त्यावेळीं व गांधीजींच्या सत्याग्रह युद्धाच्या दोन्ही प्रसंगीं हजारों तरुण-तरुणींनीं संगिनीच्या पहाऱ्यांत घुसून, झेंडावंदनांचे व ध्वजमिरवणुकीचे कार्यक्रम पार पाडलेले आहेत. लाथाबुक्यांचा मार, लाठ्यांचा प्रहार, चाबकांचे फटके, घोड्यांच्या खुरांचे आघात, अश्रुवायूचा व बंदुकींच्या गोळ्यांचा मारा हें सर्व सहन करूनही त्यांनीं ध्वजाचें रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आणि शेवटीं

निरुपाय होऊन पकडले गेल्यानंतर मोठ्या आनंदानें कारावास पत्करला व तेथील हालअपेष्टांत सुखानें कालक्रमण करून आपल्या करारी स्वभावाचें उत्कृष्ट दिग्दर्शन केलें.

राष्ट्रध्वज ही राष्ट्राची एक खूण आहे. देशांतील सर्व धर्म, पंथ व जाती एकत्र आणण्याचा हा एक महामंत्र आहे. साध्या दगडाला देवकळा प्राप्त झाल्यावर ज्याप्रमाणें आपण त्याला वंदन करतों त्याप्रमाणें साध्या कापडाला विवक्षित रंग देऊन त्याला राष्ट्रध्वज बनविल्यावर त्याला राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाचा मान दिला पाहिजे. देव व ध्वज हीं दोन्ही सारखींच आहेत. देवाच्या मूर्तीला आपण भक्तिभावानें नमस्कार करतों, त्याप्रमाणें राष्ट्रीय झेंड्याला दररोज प्रणाम केला पाहिजे !

●

## ध्वजाची प्रतिष्ठा

जेव्हां एखाद्या राष्ट्रांतले लोक आपल्या ध्वजासाठीं मरण्यालाही तयार होतात तेव्हांच त्यांना खरोखर स्वतःचा असा राष्ट्रध्वज मिरविण्याचा अधिकार प्राप्त होतो. राष्ट्रध्वज हें राष्ट्राच्या आत्मयज्ञाच्या तयारीचें प्रतिक होय ! इंग्लंडचें 'युनियन जॅक' अमेरिकेचें तारे आणि पट्टे असलेलें राष्ट्रीय निशाण, जर्मनीचा स्वस्तिक चिन्हांकित राष्ट्रीय ध्वज, जपानचा उगवत्या सूर्याचें चित्र असलेला झेंडा किंवा इतर कोणताही राष्ट्रध्वज हें त्या त्या राष्ट्राची आत्मार्पणासाठीं सिद्धता असल्याचें चिन्हच आहे. आपला राष्ट्रध्वज हेंही आपल्या स्वार्थत्यागाच्या सिद्धतेचें प्रतिक झालें पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आणि उन्नतीसाठीं लढण्याला किंबहुना मरण्यालाही सिद्ध आहों असें आपण दाखवून दिलें पाहिजे. शोभेसाठीं वापरावयाचें एक रंगीत कापड एवढीच आपल्या राष्ट्रध्वजाची आपण किंमत मानूं तर तें असलें किंवा नसलें सारखेंच ! या ध्वजाच्या प्रतिष्ठारक्षणासाठीं आपण सर्व स्त्री-पुरुष आणि मुलें देखील सिद्ध राहिलों पाहिजे !

●

# झेंडा-गीत

उठा बंधुनो ! प्रभात झाली झेंडा-वंदन करूं चला
प्रतापशाली गगनीं फडके अमरध्वज तो पाहुं चला ॥
जेविं चराचरिं वायु वाहुनी जीवनरस तो ओतीतसे
प्रभातकाळीं तेवीं ध्वज हा अस्मन्मानस फुलवितसे ॥
प्रभात-काळीं दिनकर कोमल सुमगण जेवीं हंसवितसे
सुंदर हंसरा ध्वज हा विजयी तेविं मनाला खुलवितसे ॥
हंसवी चित्ता, आशा निर्मी, स्फूर्ति अंतरीं संचरवी
तेजोदायक तिमिरविदारक तळपे ध्वज हा जसा रवी ॥
पहा स्वकीया करा हलवुनी आपणास तो बोलवितो
माझ्याखालीं गोळा व्हा रे तमाम सारे तो वदतो ॥
झेंड्याखालीं तमाम सारे जमाव करूंया मोदानें
अंतरंग रंगवूं चला रे शौर्यें धैर्यें वीर्यानें ॥
राष्ट्राचा हा प्राण अमोलिक राष्ट्राचें हें जीवन हो
सर्वस्व असे अपुलें जें जें तें तें झेंडा दावित हो ॥
ज्या राष्ट्रातें झेंडा नाहीं त्यातें नाहीं जगिं मान
मान तयाची वरी न होई करिती त्याचा अपमान ॥
विद्या-वैभव-कला-कीर्तिचें अब्रूचें अभिमानाचें
संरक्षण होतसे जरि वरी गगनीं झेंडा हा नाचे ॥
झेंडा म्हणजे जीवन अपुलें झेंडा म्हणजे स्वप्राण
झेंडा म्हणजे राष्ट्र आपुलें झेंडा दैवत ना आन ॥
स्वातंत्र्याचें चिन्ह सुमंगल म्हणजे झेंडा हा आहे
झेंडा फडके झळके जोंवरि तोंवरि वैभवयश राहे ॥

झेंडा चमके जोंवरि अपुला विश्वीं विजयी विक्रांत
राहूं तोंवरि आपण तेजें निर्भय निर्मळ निर्भ्रांत ॥
झेंड्याला या वित्ताहून प्राणांहूनहि जपा सदा
झेंडा अपुला जीव धर्महि झेंडा अपुला देव वदा ॥
ऐक्याच्या वातावरणाचा झेंडा असतो निर्माता
स्वातंत्र्याच्या संगीताचा झेंडा असतो उद्गाता ॥
झेंड्यासाठीं नाना देशीं नाना वीरीं निज रक्त
दिलें, प्राणही फेंकुन दिधले झेंड्याचे व्हा तुम्हि भक्त ॥
लाखों करिती बलिदान मुदें एका या झेंड्यासाठीं
झेंड्याचा महिमा न वर्णवे कधीं कुणाही या ओठीं ॥
सर्वस्वाचें सर्वैक्याचें राष्ट्रत्वाचें हें चिन्ह
एकचित्त संमूर्त जाहलें धरा अंतरीं ही खूण ॥
एका अत्तर थेंबामध्यें लाखों कोटी सुमनांचें
ओतिलें असें सर्वस्व तसें झेंड्यामध्यें राष्ट्राचें ॥
झेंडा दावी परंपरेला झेंडा संस्कृति गात असे
झेंडा तुमच्या पूर्ववैभवें सद्गुणवृंदें चमकतसे ॥
मधमाशा त्या पोळ्यासाठीं निशिदिनिं जेवीं जपताती
झेंड्याला या राखूं आपण करूं प्रतिज्ञा प्राणांतीं ॥
जे आतांचें जें पूर्वींचें भविष्य काळांतीलहि जें
अपुलें मंगल सुंदर उज्वल तें या झेंड्यामध्यें सजे ॥
झेंडा सुंदर थोर तिरंगी ललामभूत त्रिजगातें
त्रैलोक्य उभें अभिराम अशा या झेंड्याला नत नमतें ॥
प्रातःस्मरणीया रमणीया वरणीया झेंड्या नमन
तुला करितसों, तीव्र भक्तीनें जावो असुचें मन भरुन ॥

—साने गुरुजी

★




हिन्दभूमीचा । हा विजयध्वज देशाचा ॥ ध्रु० ॥
नमत नाहीं हा कालिकाळाला
नमत नाहीं पाशवी– बलाला
नमत नाहीं साधू—छळकाला
एक देवाला । नमितो हा ध्वज देशाचा ॥ १ ॥
सनातना आरक्त दर्शवी
हरितानें इस्लाम भूषवी
धवल सकल धर्मांस शोभवी
तीन रंगांचा । हा विजयध्वज देशाचा ॥ २ ॥
यावरि जें शुभचक्र विलसतें
दीन भारता रक्षायातें
येई सुदर्शन ऐसें गमतें
चक्र चिन्हाचा । हा विजयध्वज देशाचा ॥ ३ ॥
तरुणांच्या स्वार्थत्यागानें
श्रेष्ठांच्या तपसामर्थ्यानें
परमेशाच्या कृपाबलानें
यशस्वी झाला । हा विजयध्वज देशाचा ॥ ४ ॥
परवशतेच्या तीव्र यातना
हलवतील ज्या ज्या जीवांना
मुक्तिमार्ग दावील अशांना
आत्मशुद्धीचा । हा विजयध्वज देशाचा ॥ ५ ॥
राष्ट्राच्या प्राणाचा हा ठेवा
सकळांनीं हा सांभाळावा
पंचप्राणें ओवाळावा
अशा मानाचा । वंदूं हा ध्वज देशाचा ॥ ६ ॥

# झेंडा गीतें

[ चाल—हरहर महादेव बोला .. ]

भरतभूमिचा तीन रंगाचा झेंडा फडफडला ॥
बंधुनो कां निजलां बोला ? ॥ ध्रु०

या झेंड्यास्तव प्रथम लढा तो नागपुरीं झाला
निःशस्त्र असतां, परकीयांचा नांगा जिरवीला ॥
घाला विजयाची माला ॥ १

माता-भागिनीवरती लाठी, घोडा चालविला
नाहीं सुटला, शत्रू थकला, जय भारत बोला ॥
घाला विजयाची माला ॥ २

सत्याग्रह तो झेंड्यासाठीं, सोलापुरीं झाला
राष्ट्रवीरांनीं कोर्टावरतीं, झेंडा फडकविला ॥
घाला विजयाची माला ॥ ३

किती जणांना झेंड्यासाठीं नेलें तुरुंगाला
सक्तमजूरी शिक्षा दिधली, कितेक फांसाला ॥
घाला विजयाची माला ॥ ४

स्वातंत्र्याचा झेंडा घेउनि जवाहीर आला
शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो निघा लढायाला ॥
घाला विजयाची माला ॥ ५

महाराष्ट्राचा भगवा झेंडा, मर्द मराठ्यांचा
तीन रंगांचा झेंडा विजयी वीर भारताचा ॥
घाला विजयाची माला ॥ ६

रक्त सांडलें, प्राणही गेले फांस गळां आला
सोडुं नका त्या मातृभूमिच्या राष्ट्रीय झेंड्याला ॥
घाला विजयाची माला ॥ ७

शुभ्र रंग तो शुद्ध खादीचा दिसे निशाणाला
शांततेचा लढा आमुचा सांगा जगताला ॥
घाला विजयाची माला ॥ ८

रंग हिरवा भूमातेचा राष्ट्र–शेतकीचा
मजदूरांचा किसानांचा देश असे ज्यांचा ॥
घाला विजयाची माला ॥ ९ ॥
वाण केशरी विरक्तीचा स्वार्थत्यागाचा
आत्मशक्तिचा प्रभाव दावा स्वाभिमानाचा ॥
घाला विजयाची माला ॥ १०॥
चक्राचें तें चित्र काढलें तोफ जणू आजला
संघटणेच्या किल्ल्यावरुनी उडवा शत्रूला
घाला विजयाची माला ॥११॥

—हरीभाऊ भंडारे

# राष्ट्रध्वज

[ चाल—बहु असोत सुंदर संपन्न... ]

उंच उंच राष्ट्रध्वज फडकुं द्या वरी
द्या मुजरा सानथोर नमुनी अंबरीं ॥ ध्रु० ॥
गगनीं जणुं सूर्यासम तळपतो पहा
शरिरीं जणु प्राणासम विलसतो अहा
हिंदभूमि चैतन्यें स्फूर्त जो करी ॥ १ ॥
झालेला त्याग सर्व यांत ओतला
झालेला यज्ञ सर्व यांत बिंबला
भक्तिशक्ति राष्ट्राची दावि अंतरीं ॥ २ ॥
राष्ट्राच्या स्वातंत्र्या सतत सुचवितो
राष्ट्राच्या अभिमाना सतत जागतो
धैर्य–कीर्ति विजयदायि हाच संगरीं ॥ ३ ॥

—मायदेव

# राष्ट्रीय पताका

राष्ट्र-गगनकी दिव्यज्योति राष्ट्रीय पताका नमो ! नमो ! !
भारत जननीके गौरवकी अविचल शाखा नमो ! नमो ! ॥ध्रु०॥

करमें लेकर इसे शूरमा तीस कोटि भारत सन्तान ।
हँसते हँसते मातृभूमिके चरणोंपर होंगे बलिदान ॥
हो घोषित निर्भीक विश्वमें तिरल तिरङ्गा नवल निशान ।
वीर हृदय खिल उठे, मार लें भारतीय क्षणमें मैदान ॥
हो नसनसमें व्याप्त चरित शूरमा शिबीका नमो ! नमो ! !
राष्ट्र-गगनकी दिव्यज्योति राष्ट्रीय पताका नमो ! नमो ! ॥ १ ॥

नव युवकों ! स्वातंत्र्य-समरमें नवजीवन संचार करो ।
शस्त्र अहिंसासे दलकर दासता-दुर्गको क्षार करो ॥
शान्ति-क्रान्ति युगमें हे वीरों ! जीवन-सुमन निसार करो ।
ऊँचे स्वरसे एकसाथ जननीकी जयजयकार करो ॥
शक्ति देखकर शत्रु शिविरमें मचे सनाका नमो ! नमो ! !
राष्ट्र गगनकी दिव्यज्योति राष्ट्रीय पताका नमो ! नमो ! ॥ २ ॥

उंच्च हिमालयकी चोटीपर जाकर इसे उड़ायेंगे ।
विश्वविजयिनी राष्ट्रपताकाका गौरव फहरायेंगे ॥
समराङ्गणमें लाल लाडले लाखों बलि बलि जायेंगे ।
सबसे उंचा रहे, न इसको नीचे कभी झुकायेंगे ॥
गूँजे स्वर संसार-सिंधुम स्वतन्त्रताका नमो ! नमो !
राष्ट्र-गगनकी दिव्यज्योति राष्ट्रीय पताका नमो ! नमो ! ॥ ३ ॥

★

# नव-हिंद-राष्ट्र-झेंडा

(२०)

वद्यांत वद्य आम्हा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ध्रु० ।

रमवीत हा जनाला । जमवीत वीर माला
शमवील शत्रुखण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ १ ।

धरि सूत्रकार्य चक्र । प्रिय मार्ग तो अवक्र
सरल-क्रियेंत गुण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ २ ।

भगवा विरक्ति रंग । तें हिंद-अंतरंग
मोक्षक्रियेंत गुण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ३ ।

धवलत्त्व इतर आर्य । हरितीं महम्मदीय
ऐक्यक्रियेंत गुण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ४ ।

प्यारे मुमुक्षु भाई । विनती तुम्हा सदा ही
हृदयांतुनी न सांडा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ५ ।

स्वातंत्र्य-मोक्ष दाता । सायुज्य-मोक्ष दाता
जगिं हाचि एक गुण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ६ ॥

सत्याग्रहप्रकारीं । सेवूनि निर्विकारी
करूं वंद्य सर्व खण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ७ ॥

रण शांतियुक्त खेळूं । रण शुद्ध, मुक्त खेळूं
करूं वंद्य सर्व खण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ८ ॥

कारागृहांत राहूं । यम-धर्म भेटि घेऊं
करूं वंद्य सर्व खण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ ९ ॥

मिळवून भाई भाई । स्थापूनि लोकशाही
करूं वंद्य सर्व खण्डा । नव हिंद राष्ट्र झेंडा ॥ १० ॥

—सेनापति बापट

# तीन रंग का झण्डा प्यारा

त्याग आणि पराक्रम, पावित्र्य आणि शान्ति व उत्साह आणि वैभव सुचविणारा आमचा हा प्रिय तिरंगी झण्डा उंच फडकत राहो! आम्ही हिन्दु-मुसलमानादि सर्व, याच्याखालीं संघटित होऊं आणि आपल्या कुरबानीनें आपल्या प्रिय हिन्दभूला स्वतंत्र व सुखी करूं!

तीन रग का झण्डा प्यारा,
ऊँचा उड हरदम फहराय ॥ १ ॥
सत्य-न्याय का चिन्ह हमारा,
प्रेम सुधा सब पर बरसाये ॥ २ ॥
इस झण्डे को आगे लेकर,
एक कौम बन कदम बढाये ॥ ३ ॥
अपनी अपनी कुरबानी को,
आजादी क लिए चढाये ॥ ४ ॥
फिर से प्यारा हिन्द हमारा,
सुख की लहरों से लहराये ॥ ५ ॥
हिन्दु-मुस्लिम, बौद्ध पारसी,
ब्राह्मण, हरिजन, सिख, ईसाई ॥ ६ ॥
हम तो एक वतन के ही हैं,
आपस में सब भाई-भाई ॥ ७ ॥
हिल मिलकर अब काम करेंगे,
आजादी भारत पा जाये ॥ ८ ॥
तीन रंग का झण्डा प्यारा,
ऊँचा उड हरदम फहराये ॥ ९ ॥

—श्रीमन्नारायण अग्रवाल

# झण्डा वन्दन

एक, हमारा ऊँचा झण्डा, एक हमारा देश !
इस झण्डे के नीचे निश्चित एक अमिट उद्देश !
हमारा एक अमिट उद्देश ॥ ध्रु० ॥

देखा जागृति के प्रभात में एक स्वतन्त्र प्रकाश !
फैला है सब ओर एक-सा एक अतुल उल्लास !
कोटि-कोटि कंठो में कूजित एक विजय-विश्वास !
मुक्त पवन में उड उठने का, एक अमर अभिलाष !
सबका सुहित, सुमंगल सबका, नहा वैर-विद्वेष !
एक हमारा ऊँचा झण्डा, एक हमारा देश ॥ १ ॥

कितने वीरों ने कर करके प्राणों का बलिदान !
मरते-मरते भी गाया है इस झण्डे का गान !
रक्खेंगे ऊँचे उठ हम भी अक्षय इसकी आन !
चक्खेंगे इसकी छाया में रस-विष एक समान !
एक हमारी सुख सुविधा है, एक हमारा क्लेश !
एक हमारा ऊँचा झण्डा, एक हमारा देश ॥ २ ॥

मातृभूमि की मानवता का जाग्रत जय-जयकार !
फहर उठे ऊँचे से ऊँचा यह अविरोध, उदार !
साहस, अभय और पौरुष का यह सजीव संचार !
लहर उठे जन जन के मनमें सत्य अहिंसा प्यार !
अगनिक धारा ओं का संगम, मीलन-तीर्थसन्देश !
एक हमारा ऊँचा झण्डा, एक हमारा देश !
सुनें सब ! एक हमारा देश ॥ ३ ॥

—सियारामशरण गुप्त

IRBK-0108199